ePaper
| वर्ष - 6 | अंक - 162 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | |बुधवार| दिनांक 21 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# मुख्यमंत्र्यांची 40 आमदारांसह आज दिल्लीवारी



## आतील पानांत

- विरोधक तर असला पाहिजे आणि तोही दिलदार
- जिल्हाधिकाऱ्यांना 'अल्टिमेटम'!
- राहुल गांधींचे भारत जोडो पक्षात चैतन्य आणेल




शिवसेनेचा मुख्यमंत्री झाल्यानंतर पुढच्या अडीच वर्षात आम्हाला चांगला अनुभव आला नाही. वेगवेगळ्या कारणांसाठी उद्धव ठाकरे 'मातोश्री'वर थांबायचे. तो अजित पवार पहाटेच मंत्रालयात येऊन बसायचा. अकरा वाजता मंत्रालय उघडायचं आणि हा बाबा सकाळी साडे सातलाच मंत्रालयात येऊन बसायचा. या काळात राष्ट्रवादीने सगळा निधी नेला, त्यांनी सगळी कामं नेली.

- शहाजी बापू पाटील

तुम्हाला जर जास्तीची काही माहिती असेल आणि ईडीकडून पेपर लीक होत असेल, तर मला दिल्लीला जाऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी चर्चा करावी लागेल. कारण ईडीचे कागदपत्रे काही लोकांकडे लीक होत असतील तर हा राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न आहे. मी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांना अतिशय विनम्रपणे विनंती करते की, त्यांनी याबाबतची चौकशी लावावी.

-सुप्रिया सुळे, खासदार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी



## शिवसेनेचे आंदोलन : 'वेदान्त फॉक्सकॉन' महाराष्ट्रातच राहु द्या!

# 40 आमदार, 12 खासदार गुजरातला न्या!!

### शिवसेनेचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष ॲड. सचिन भोसले यांची टीका

| पिंपरी |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटात गेलेल्या ४० आमदार आणि १२ खासदारांना पुन्हा गुजरातला न्या. मात्र, महाराष्ट्रातील प्रकल्प गुजरातला नेऊ नका, असे आवाहन करत मोदी सरकारला आणि शिंदे-फडणवीस सरकारला महाराष्ट्रातील जनता मतपेटीतून धडा शिकवेल, अशी टीका पिंपरी-चिंचवड शहर शिवसेनेचे शहराध्यक्ष ॲड. सचिन भोसले यांनी केली.'वेदांत फॉक्सकॉन प्रकल्प' तळेगाव एमआयडीसीतून गुजरातला नेल्याच्या निषेधार्थ सचिन भोसले यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड शहर शिवसेनेच्यावतीने आंदोलन करण्यात आले.



यावेळी शिवसैनिकांनी 'खोके सरकारचा धिक्कार असो' 'महाराष्ट्राचा रोजगार पळवणाऱ्या शिंदे सरकारचा धिक्कार असो' अशी घोषणाबाजी केली. आंदोलनात माजी आमदार गौतम चाबुकस्वार, शहर महिला संघटिका ॲड. उर्मिला काळभोर, गोविंद गोळवे, कामिनी मिश्रा, धनंजय आल्हाट, वैशाली मराठे, सचिन सानप, पांडुरंग पाटील, यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

### शनिवारी आदित्य ठाकरे तळेगावला आंदोलन करणार...

ॲड. सचिन भोसले यांनी आंदोलनात सांगितले की, महाराष्ट्राचा रोजगार पळवणाऱ्या सरकारचा निषेध करण्यासाठी तळेगाव एमआयडीसीमध्ये जेथे हा प्रकल्प होणार होता, तेथे लवकरच युवा सेनेचे प्रमुख, माजी मंत्री आदित्य ठाकरे हे आंदोलन करणार आहेत. या आंदोलनात शिवसैनिक मोठ्या संख्येने सहभागी होतील.

फोडा आणि राज्य करा हे ब्रिटिशांप्रमाणे भाजपची रणनीती आहे. भाजपच्याविरोधात शिवसैनिक एकजुटीने लढा देतील. तर ॲड. उर्मिला काळभोर म्हणाल्या की, बाळासाहेबांचा सच्चा शिवसैनिक रोजगार पळवणाऱ्या भाजपला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही.

- गौतम चाबुकस्वार, शिवसेना नेते

# पुणे-बंगळुरू हायवेवरील वाकड चौक येथे रस्त्यांची चाळण

## वाकड चौकात खड्डे चुकवताना ट्रक झाला पलटी, प्रशासन ढिम्म

| पिंपरी चिंचवड |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

पुणे-बंगळुरू हायवेवरील वाकड चौक येथे आज दुपारी वाहतूक कोंडी झाली. खड्डे चुकवताना ट्रक पलटी झाल्याने हा प्रकार घडला आहे. त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागला.




दुपारी 1 ते 1.30 च्या दरम्यान भूमकर चौक ते वाकड चौक दरम्यान वाहतूक कोंडी झाली होती. वाहनांची लांब रांग लागली होती. तसेच, वाहने धीम्या गतीने जात होती. मी जेव्हा वाकड चौकात पोहोचलो, तेव्हा वाकड पोलीस चौकी जवळ पाहिले, की पुलाच्या खाली एक ट्रक पलटी होऊन पडला आहे. तेथे दोन क्रेन होते, जे ट्रकला सरळ करण्यासाठी आणले गेले होते. वाहतूक पोलीस वाहतूक नियमन करत होते व वाहनांना थांबू देत नव्हते. वाकड चौकात मेन हायवेवर मोठे 2 ते 3 खड्डे आहेत. जर मोठे वाहन जसे कार, ट्रक 40 किलोमीटर प्रति तास वेगाने येत असेल, तर एक तर मोठा खड्डा पाहून लेन बदलण्याचा प्रयत्न करते. पण त्यावेळेस मागून दुसरे वाहन येत असेल तर लेन बदलता येत नाही. अशा वेळेस खड्ड्यातून जावे लागते व ब्रेक दाबून स्पीड कमी केल्यास वाहन स्लिप होण्याची शक्यता असते. ट्रकनेसुद्धा ब्रेक दाबला असावा व खड्ड्यामुळे तोल जाऊन तो पलटी झाला असावा."वाकडमधील रहिवाशी तसेच पिंपरी चिंचवड हाऊसिंग फेडरेशनच्या व्हाईस चेअरमन तेजस्विनी सवाई ढोमसे म्हणाल्या, की भूमकर चौक ते वाकड चौक या भागात पुणे – बंगळुरू हायवेवर खूप खड्डे झालेले आहेत. दोन ते तीन खूप मोठे खड्डे आहेत. हिंजवडी वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक विठ्ठल कुबडे यांनी माहिती दिली की, एक डम्पर ट्रक आज 12.45 वाजेच्या सुमारास वाकडहून साताऱ्याच्या दिशेने पुणे-बंगळूरु हायवेवरून जात असताना एक मोठा खड्डा चुकवताना त्याचा तोल गेला व तो डिव्हायडरला धडकून पलटी झाला.

### वाहतूक पोलिसांनी बुजविले खड्डे

वाहतूक विभागाचे कर्मचारी यांनी वाकड पोलीस चौकीजवळ मेन हायवेवरून बाणेरकडे जाणारी वाहने सर्व्हिस रोड वरून वळवली . तसेच क्रेनच्या सहाय्याने पलटी झालेला डंपर ट्रक सरळ करत असताना तो पलीकडे पडण्याची शक्यता असल्याने पलीकडे देखील वाहतूक विभागाचे कर्मचारी तैनात होते. 10 ते 12 वाहतूक विभागाचे कर्मचारी वाकड चौकामध्ये दोन्ही बाजूला वाहतूक नियमन करत होते. अंदाजे दुपारी 1.45 वाजेच्या सुमारास ट्रक सरळ करून हिंजवडी वाहतूक विभागाच्या कार्यालयाजवळ नेण्यात आला. वाहतूक विभागाच्या कर्मचाऱ्यांनी हायवेवर आणखी नवीन अपघात होऊ नये यासाठी तेथील खड्डे बुजवले.

## शॉर्ट न्यूज

### मोसमी पावसाच्या परतीचे वेध



।पुणे। महाईन्यूज ।

भारतासाठी हक्काचा पाऊस असलेल्या मोसमी पावसाच्या परतीचे वेध आता लागले आहेत. भारतीय हवामान विभागाने जाहीर केल्यानंतर पुढील दोन दिवसांत राजस्थानसह उत्तर भारतातील काही राज्यांतून मोसमी पाऊस परतीचा प्रवास सुरू करण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातून तो त्यानंतर आठ ते दहा दिवसांनी माघारी फिरू शकतो.

सध्या देशात सरासरीच्या तुलनेत सात टक्के अधिक, तर महाराष्ट्रात २६ टक्के अधिक पावसाची नोंद झालेली आहे. पुढील तीन ते चार दिवस प्रामुख्याने विदर्भात, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात काही भागांत विजांच्या कडकडाटात पावसाची शक्यता आहे. मोसमी पावसाने २९ मे रोजी केरळमधून भारतात प्रवेश केला होता. त्यानंतर त्याने सर्वात शेवटी २ जुलैला पश्चिम राजस्थानाच्या भागात प्रवेश करून संपूर्ण देश व्यापला होता. त्यानंतरच्या कालावधीत देशात कमी-अधिक प्रमाणात पाऊस झाला.

# विरोधक असावा आणि तोही दिलदार!

## सुप्रिया सुळेंचा मुख्यमंत्र्यांना टोला

।पुणे। महाईन्यूज ।



बारामती लोकसभा मतदारसंघाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज मतदार संघातील प्रश्ना बाबत महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांची भेट घेऊन चर्चा केली. त्यानंतर सुप्रिया सुळे यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला असता त्यावेळी त्यांना शिंदे गट आणि उद्धव ठाकरे यांच्यामध्ये दसरा मेळाव्यावरून वाद सुरू झाला आहे या माध्यमांच्या प्रश्नावर त्या म्हणाल्या की, शरद पवार साहेब काही दिवसांपूर्वी म्हणाले होते की,मुख्यमंत्री हे पद खूप मोठे असते. हे पद सर्वसमावेशक असले पाहिजे. तसेच आमच्या काळात देखील दसरा मेळावा होत होता. त्यावेळी आमच्या विरोधात त्या व्यासपीठावरून दिलदारपणे भाषण होत असायची. आम्ही देखील भाषण उत्सुकतेने लाईव्ह पाहत असायचो की, आपल्या विरोधात काय बोलले आहेत. त्यामुळे मोठा नेता असतो ना तो नुसत्या पदाने मोठा होत नाही ,तो कर्तुत्ववाने मोठा होतो. राजा किंवा कुठलाही मोठा माणूस हा दिलदार असला पाहिजेअसे म्हणत सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना टोला लगावला. तसेच त्या पुढे म्हणाल्या की, हे दुर्दैव असून महाराष्ट्राच्या संस्कृतीला न शोभणारी गोष्ट आहे. शरद पवार मुख्यमंत्री असताना त्यावेळी देखील मेळाव्यात बाळासाहेब ठाकरे दिलदारपणे पवार साहेबांवर टीका करायचे आणि याला तर खरी गंमत म्हणतात पण विरोधक तर असला पाहिजे आणि तोही दिलदार असला पाहिजे.अशी भूमिका त्यांनी मांडली.

भाजपच्या नेत्या केंद्रीय मंत्री निर्मला सितारामन या बारामती दौऱ्यावर येत असल्याने सुप्रिया सुळे या नागरिकांच्या भेटीगाठी घेत आहेत. अमेठी जिंकली,आता बारामती जिंकू अस विधान भाजपचे नेते राम शिंदे यांनी केले आहे. त्यावर सुप्रिया सुळे म्हणाल्या की,माझे आयुष्य अतिशय पारदर्शक असून मी मागील 13 वर्षांपासून बारामती लोकसभा मतदार संघाच लोकप्रतिनिधित्व करीत आहे. माझे फेसबुक,ट्विटर हे कोणी थोडासा वेळ काढून पाहिलं तर समजेल माझ्या कामाचा वेग, देशातील अनेक जण मला फॉलो करतात अशा शब्दात भाजपचे नेते राम शिंदे यांना टोला लगावला.

### मला 'त्या' भाजपच्या कार्यकर्त्यांचे वाईट वाटत

राष्ट्रवादीमधील काही कार्यकर्ते नियुक्त्यांवरून नाराज आहेत. भाजपात जाणार आहेत अशी चर्चा सुरू आहे. त्यावर त्या म्हणाल्या की, टॅलेंट तर राष्ट्रवादी काँग्रेसचे आहे.दौरा पहा किंवा पक्ष पहा,त्या पक्षामध्ये 50 टक्क्यांपेक्षा अधिक लोक राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत. तसेच दौऱ्यामधील परिस्थिती देखील तशीच आहे. लीड घेणारे लोक कोण आहेत.काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस मधील आहेत. एखाद्या संस्थेमधून दुसऱ्या विचाराच्या संस्थेत जात असेल तर तो त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. तिथे जाऊन पण त्यांना जबाबदारी मिळते.पण मला एकाच गोष्टीचे वाईट वाटत की,ज्यावेळी संघर्षाचा काळ होता. तेव्हा भाषण देण्यापासून सतरंज्या उचलण्याच काम ज्या भाजपच्या कार्यकर्त्यांनी केले. त्या लोकांचा कुठे ही मानसन्मान होत नाही. पंरतु बाहेरून आलेल्यांचा मानसन्मान खूप होतो.

### केंद्रिय अर्थमंत्री माझ्या मतदारसंघात येत असल्याने खूप आनंद

अर्थमंत्री निर्मला सीतारामन मतदार संघात येणार असल्याने काय अपेक्षा आहेत. त्यावर सुप्रिया सुळे म्हणाल्या की,माझी दिल्ली येथे निर्मला सीतारामन यांच्या सोबत अनेक वेळा भेट होत राहते. मागील वेळेस देखील म्हणाले होते की,आपण जर या भागात येत असला तर आम्ही मनापासून तुमचे स्वागत करतो. देशाच्या अर्थमंत्री निर्मला सितारामन माझ्या मतदारसंघात येत असल्याने खूप आनंद होत आहे. तसेच अरुण जेटली देखील बारामतीमध्ये आले होते. ते गोविंद बागेत राहिले होते. त्यावेळी देखील अतिशय चांगला कार्यक्रम झाला होता. अरुण जेटली कृषी केंद्राला भेट दिली होती.त्यामुळे निर्मला सितारामन यांनी बारामती मतदार संघात अनेक संस्था चांगल्या काम करीत आहे त्या सर्वांना त्यांनी निश्चित भेट द्यावी आणि त्या पाहण्यासाठी मी त्यांना आमंत्रित करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

### दादा पालकमंत्री होता तेव्हा आठवड्याला बैठका व्हायच्या

दादा पालकमंत्री असताना दर आठवड्याला जिल्ह्यातील प्रश्ना बाबत आढावा बैठक होत होती. परंतु दुर्दैवाने मागील अडीच महिन्यापासून जिल्ह्याला पालकमंत्री नसल्याने आढावा बैठक होत नाही. खडकवासला भागात येणारा धायरी,वारजे परिसरात कचऱ्याचे ढीग वाढले आहेत.तर दुसऱ्या बाजूला पाणी कपात देखील सुरू केली आहे.अशा तक्रारी नागरिकांमार्फत येत आहे. आपल्या शहराला पाणी पुरवठा करणारी धरण पूर्ण भरली असताना पाणी कपात का होत आहे असा सवाल देखील सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला.

# बँक ऑफ बडोदाच्या गृह कर्ज वितरण कार्यालयाच्या दुसऱ्या शाखेचे उद्घाटन

## पिंपरी-चिंचवड मधील सर्व नागरिकांना नुतन कार्यालयाचा लाभ होणार

। पिंपरी ।। महाईन्यूज

**बँक ऑफ बडोदाच्या गृह कर्ज, प्रापर्टी तारण कर्ज वितरण विभागाच्या दुसऱ्या शाखेचे पिंपरी-चिंचवडमध्ये उद्घाटन करण्यात आले. बँकेचे वरिष्ठ अधिकारी वरिष्ठ महाव्यवस्थापक राजेश मल्होत्रा यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.**



महाव्यवस्थापक एच. टी. सोलंकी, महाव्यवस्थापक टी. म. मीनी, क्षेत्र प्रमूख नंदीता गायकवाड, मुख्य प्रबंधक नितीन पाटील व अतुल चव्हाण आदी प्रमूख उपस्थित होते.

# पुण्याच्या काही भागातील पाणीपुरवठा गुरुवारी राहणार बंद!

। पुणे। महाईन्यूज ।



विद्युत, स्थापत्य विषयक कामांमुळे पर्वती जलकेंद्रांतर्गत येणाऱ्या शहरातील काही भागांचा पाणीपुरवठा गुरुवारी (२२ सप्टेंबर) बंद राहणार आहे. शुक्रवारी सकाळी उशिरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होण्याची शक्यता महापालिका प्रशासनाकडून व्यक्त केली. पर्वती जलकेंद्रांतर्गत येणारा सहकारनगर, पद्मावती, बिबवेवाडी, मुकुंदनगर काही भाग, महर्षीनगर, गंगाधाम, चिंतामणी नगर भाग एक-दोन, लेक टाऊन, शिवतेजनगर, अपर इंदिरानगर, लोअर इंदिरानगर, शेळकेवस्ती महेश सोसायटी, बिबवेवाडी गावठाण, प्रेमनगर, आंबेडकरनगर डायस प्लॉट, ढोलेमळा, सॅलेसबरी पार्क, गिरीधरभवन चौक, ठाकरे वसाहत, पर्वती गावठाण, भाग्योदयनगर, शिवनेरीनगर, मिठानगर, कुमार पृथ्वी, सर्वेक्षण क्र. ४२ कोंढवा खुर्द आणि साईबाबनगर, शहरातील सर्व पेठा, दत्तवाडी परिसर, राजेंद्रनगर, लोकमान्यनगर, डेक्कन परिसर, शिवाजीनगर परिसर, स्वारगेट परिसर या भागात गुरुवारी पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

### भूसंपादनासह प्रलंबित प्रश्नांसाठी भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा

# जिल्हाधिकाऱ्यांना 'अल्टिमेटम'!

## जिल्हा प्रशासनाशी संबंधित प्रस्ताव महिनाभरात मार्गी लावणार



**पिंपरी-चिंचवड ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**भोसरी विधानसभा मतदार संघातील राज्य सरकारशी संबंधित प्रलंबित प्रश्न मार्गी लावावे. तसेच, भूसंपादनाचे सात प्रस्ताव प्राधान्याने येत्या महिनाभरात मंजूर करावे, अशी मागणी भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. भोसरीसह पिंपरी-चिंचवडमधील प्रलंबित प्रश्नांसंदर्भात जिल्हाधिकारी राजेश देशमुख यांच्यासोबत पुण्यात बैठक घेण्यात आली.**

त्यावेळी विविध मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. भोसरी विधानसभा मतदारसंघातील प्राधान्याने भूसंपादनाचे सात प्रस्ताव तातडीने येत्या महिन्याभरात मार्गी लावावे. त्यासाठी भूसंपादन विभाग, नगर रचना विभाग आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका भूमि अभिलेख विभाग यांनी समन्वय साधून तातडीने प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली.

आमदार लांडगे म्हणाले की, सफारी पार्क, मोशी येथील जागा पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी लवकरात-लवकर जागा मागणीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा करावा. जागा हस्तांतरण करून, पुढील कार्यवाही करावी. तसेच, पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग या रस्त्यावर वाहतुकीचा ताण असल्याने पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील 'डीपी रस्ता' व 'पीएमआरडीए' हद्दीतील जागेबाबत संयुक्त स्वतंत्र बैठक आयोजित करावी. ज्यामुळे मुख्य रस्त्याला समांतर रस्ता होऊन वाहतुकीचा ताण कमी करण्यात मदत होईल, अशा सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत.

### जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीतील महत्त्वपूर्ण निर्णय पुढीलप्रमाणे...

१: पुणे-नाशिक महामार्ग सहापदरीकरण : पुणे-नाशिक महामार्ग (रोशल गार्डन ते स्पाईन रोड व स्पाईन रोड ते इंद्रायणी नदीपर्यंत) भूसंपादन करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने पुढील ८ दिवसांत भूसंपादन विभागास आवश्यक माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार भूसंपादन विभागाने पुढील १५ दिवसांमध्ये आवश्यक कार्यवाही करुन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणमार्फत सदर कामाची निविदा प्रक्रिया सुरु होणेपुर्वी तातडीने भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करावी.

२: पुणे नाशिक महामार्गावरील औद्योगिक वसाहतींधील वाहतूक कोंडी कमी करणे : तळवडे ते मोशी या परिसरात इंद्रायणीनदीला समांतर प्रस्तावित १२ मी. रस्ता तयार करणेकामी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने भूसंपादनाबाबत आवश्यक प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सत्वर सादर करावा.

३: भामा आसखेड भूमिगत पाईपलाईन योजना : सार्वजनिक बांधकाम विभाग व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने संयुक्तपणे स्थळपाहणी करुन पाईपलाईनचे कामासंदर्भात येणा-या अडचणींबाबत उपाययोजना कराव्यात व त्याबाबत जिल्हाधिकारी व मा. विधानसभा सदस्य यांना अवगत करावे.

४: चिखली येथील ८०० बेडचे प्रस्तावित हॉस्पिटल : सदर हॉस्पीटलसाठी आवश्यक शासकीय गायरान जमीनीचे हॉस्पीटल वापराकरिता प्रयोजन बदलाबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

५: इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प: पिंपरी- चिंचवड मनपा हद्दीतील इंद्रायणी नदीकाठचा भाग विकसित करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पीएमआरडीए यांनी लवकरात-लवकर प्रकल्प अहवाल तयार करुन राज्य शासनाकडे मंजूरीसाठी पाठविण्यात यावा.

६: यमुनानगर व दिघी भागातील रेड झोनबाबत: यमुना नगर व दिघी भागातील रेड झोन हद्द निश्चित करणेकामी जिल्हाधिकारी यांचे स्तरावर जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अधिकारी यांची एकत्रित बैठक आयोजित करुन हद्दनिश्चितीसंदर्भात कशा प्रकारे कार्यवाही करता येईल याबाबत तातडीने निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करावी, असे निर्णय जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीत घेण्यात आले आहेत.

---

### पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अन्यायकारक निर्णयांना स्थगिती द्यावी

# प्रशासकीय राजवटीत सामान्य नागरिकांचे कंबरडे मोडणारे निर्णय!

## मारुती भापकर यांची राज्य सरकारकडे मागणी

**पिंपरी।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**





पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व रुग्णालयांच्या वैद्यकीय सेवा सुविधा व औषध उपचाराची दरवाढ, मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपात झालेला विलंब, पे अँड पार्किंग योजना, हस्तांतर शुल्क, उद्यान प्रवेशात करण्यात आलेली भरमसाठ दरवाढ असे अनेक अन्यायकारक निर्णय महापालिकेच्या प्रशासक राजवटीत घेण्यात आले आहेत. सर्व सामान्य नागरिकांचे कंबरडे मोडणारे हे निर्णय आहेत. म्हणूनच लोकनियुक्त सभागृह अस्तित्वात येईपर्यंत या सर्व निर्णयांना स्थगिती देण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मारूती भापकर यांनी राज्य सरकारकडे केली आहे. प्रशासक तथा आयुक्त राजेश पाटील यांनी १ एप्रिल २०२२ पासून मालमत्ता हस्तांतर करताना कर योग्य मूल्याच्या ५ टक्के शुल्क भरण्याची पद्धत बंद करून राज्य शासनाच्या मुद्रांक शुल्क विभागाच्या बाजार मूल्यानुसार अर्धा टक्का मालमत्ता हस्तांतर शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला. मेट्रोसाठी १ एप्रिल पासून दस्त नोंदणी तसेच गहाणखत व्यवहारावरील मुद्रांक शुल्कावर एक टक्का अधिभार( सेस) लावला जात असताना मालमत्ता हस्तांतर शुल्कात ही जबरी वाढ केली आहे. या वाढीला स्थगिती द्यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, एमआयडीसी तिची नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकास आराखड्यातील वाहन तळाच्या जागांवर अतिक्रमणे असून त्या जागा विकसित केलेल्या नाहीत. तसेच शहरातील मुख्य रस्त्यांच्या लगतच्या प्लॅनपास बिल्डिंगच्या पार्किंगच्या जागेचा व्यवसायिक वापर होतो. या जागा ताब्यात घेऊन त्या प्रथम विकसित कराव्यात आणि नंतर पे अँड पार्किंग योजनेची अंमलबजावणी व्हावी.

मारूती भापकर यांनी यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांना मागणीचे निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगरसेवकांचा निर्धारित पाच वर्षाचा कार्यकाल १३ मार्च २०२२ रोजी संपुष्टात आला. १४ मार्च २०२२ ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत प्रशासक तथा आयुक्त राजेश पाटील यांनी खालील निर्णय घेतले आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेचे ८ रुग्णालय व २९ दवाखान्यातून गोरगरीब नागरिक अल्प दरात उपचार घेतात. प्रशासक राजेश पाटील यांनी शासन निर्णय क्र. वैशवी २०१७/प्रशा/२/दि.२० नोव्हेंबर २०१७ नुसार सुधारित दर लागू केले. हे दर १०० ते २०० टक्क्यांनी वाढले आहेत. आपल्या शहरात ७२ झोपडपट्ट्या आहेत. ही कामगारांची नगरी आहे. त्यामुळे हा निर्णय नवीन सभागृह अस्तित्वात येईपर्यंत स्थगित करावा. तसेच महापालिकेच्या शाळांना दरवर्षी शालेय साहित्य वाटप केले जाते. राज्यकर्ते व प्रशासनकर्ते यांच्या गलिच्छ टक्केवारीच्या राजकारणामुळे उन्हाळ्यात रेनकोट आणि पावसाळ्यात स्वेटर वाटप होते. यावर्षीही विद्यार्थ्यांना या साहित्यापासून वंचित रहावे लागले.

### उद्यानांसाठी दुप्पट अधिभार

शहरातील उद्यानांमध्ये प्रवेशासाठी लहान मुलांसाठी र.रु.५ इतकी फी आकारण्यात येत होती. तर नागरिकांसाठी र.रू. १० इतकी फी आकरण्यात येत होती. मात्र नव्याने विकसित केलेल्या उद्यानासाठी लहान मुलांसाठी र.रु.५ ऐवजी १०रु. तर नागरिकांसाठी र.रु.१० ऐवजी २० रुपये आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय चुकीचा असून या शहरात क्रीडांगणे कमी आहेत, उद्याने अधिकचे आहेत. त्यामुळे लहान मुलांना दिवसातून दोन वेळा उद्यानांमध्ये खेळण्यासाठी जावे लागते. तसेच ज्येष्ठ नागरिक महिला सकाळी संध्याकाळी फेरफटका मारण्यासाठी उद्यानांमध्ये जातात. त्यामुळे दिवसातून दोन दोन वेळा ही फी नागरिकांना अदा करावी लागेल. त्यामुळे हे दर पूर्वीप्रमाणेच ठेवावेत.

## संपादकीय »

# राहुल गांधींचे भारत जोडो पक्षात चैतन्य आणेल

***काँग्रेस पक्षात सर्व राज्यात आणि सर्व आघाड्यांवर पराभूत मानसिकता मोठ्या प्रमाणावर तयार व्हायला लागली होती .***

पक्षात ज्यांना भवितव्य दिसत नव्हते असे तरुण तर सक्रिय होत नव्हते उलट ज्यांनी दीर्घकाळ पक्षात मोठमोठी पदे उपभोगली असे दिग्गज नेतेही पक्षाला सोडून जात असताना खा. राहुल गांधी यांनी सुरु केलेली भारत जोडो यात्रा नक्कीच पक्षात नवचैतन्य निर्माण करण्याचा एक चांगला प्रयत्न समजला जात आहे . ७ सप्टेंबर पासून कन्याकुमारी येथून सुरु झालेली ही यात्रा १४ राज्यातून प्रवास करून साडेतीन हजारावर किलोमीटर अंतर कापणार आहे . त्यापैकी ५०० किमी अंतर आतापर्यंत या यात्रेने पार केले आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वातील या भारत जोडो यात्रेने सध्या दुसरे काहीही केले नसले तरी बोलघेवड्या भाजपनेत्यांची झोप मात्र उडविण्याचे काम केले आहे हे तरी खात्रीने सांगता येते . गेल्या बारा दिवसात राष्ट्रीय माध्यमांनी राहुल गांधी यांच्या यात्रेची पाहिजे तशी दखल घेतली नाही असे म्हणता येईल कारण बहुतांश राष्ट्रीय वृत्त वाहिन्या सध्या भाजपच्या विचारांच्या उद्योग घराण्यांच्या ताब्यात आहेत . भारत जोडो यात्रा नियोजन करताना काँग्रेसच्या कोअर टीमने नक्कीच प्रारंभ ते शेवट या दरम्यान सर्व अंगांचा विचार करून नियोजन केले असणार यात शंका नाही . यात्रा जसजशी पुढे जाईल आणि जनसमर्थन तिला प्राप्त होईल तेव्हा भाजपचे झाडून सगळे प्रवक्ते कामाला लागतील आणि त्यातील उणिवा लोकांच्यापुढे मांडण्याचा प्रयत्न करतील . दक्षिणेत तसाही काँग्रेसला बऱ्यापैकी जनाधार आहे . या यात्रेच्या माध्यमातून तो जाणवत आहे . ही यात्रा भाजपशासित प्रदेशातून जाताना कोणते वातावरण निर्माण होते आणि त्याचा भाजपवर कसा परिणाम होतो हे बघणे आवश्यक आहे. राहुल गांधींनी आपली यात्रा अधिक काळ दक्षिण मधील राज्यातून जाईल याची काळजी घेतली आहे कारण या राज्यात भाजपलाही गेल्या अनेक वर्षात हातात काहीही सापडलेले नाही अशावेळी तेथील प्रत्येक निवडणुकीत काँग्रेस प्रमुख प्रतिस्पर्धी असतो अशावेळी दक्षिणेत मजबूत पाय रोवताना लोकांच्या मनातही जागा करण्याचा एक उद्देश या यात्रेमागे काँग्रेसचा दिसत आहे . यात्रेला दिलेले भारत जोडो यात्रा हे नाव सहज निवडले नाही त्यामागे पक्षाच्या व्यापक विचारधारेचा आधार आहे . ही यात्रा केवळ पक्षात चैतन्य आणेल एवढाच पक्षाचा उद्देश आले असे वाटत नाही तर ही यात्रा ऐतिहासिक व्हावी आणि राहुल गांधींचे पक्षात कमकुवत होणारे नेतृत्व अधिक मजबूत व्हावे हा उद्देश आहेच . २०२४ ला नरेंद्र मोदींच्या समोर किमान तुल्यबळ नेता म्हणून राहुल गांधींची प्रतिमा अधिक उजळ झाल्याशिवाय भाजपला धोबीपछाड दिली जाऊ शकणार नाही हेही गणित नक्कीच यामागे आहे. नरेंद्र मोदींचा भारतीय क्षितिजावर उदय झाल्यापासून त्यांनी जाणीवपूर्वक राहुल गांधी यांची प्रतिमा भंजन करण्याची एकही संधी या काळात सोडली नाही .



## आनंदी सकाळ

# त्रियो रक्षा: कुचेलत:

धान्य न विखुरता ते व्यवस्थित पोत्यात घालून ठेवून वाचविता येते. घोड्याला नुसता चारा देवून चालत नाही. त्याला रोज चालवावे लागते. गाईंना खाऊपिऊ घातलं म्हणजे त्याचे रक्षण नव्हे. जीवन जगताना कशाचे ना कशाचे रक्षण आवश्यक आहे.

आपलेपणा, माणुसकी, प्रेम, स्नेह या चांगल्या भावनांव्दारेही आपण चांगल्या व्यक्तीमत्त्वाचे रक्षण करू शकतो. हे रक्षण सत्याने, धर्माने करता येते. सतत अभ्यास करत विद्येचे आणि सुगंधी चुर्ण वापरत शरीराच्या सौंदर्याचे तसेच सत्य आचरणाने कुळाचे रक्षण होते. इंद्रिय निग्रहाने जननेंद्रिय आणि पोटाचे आपण रक्षण करू शकतो. सदमार्गाने मन व वाणीचे रक्षण करू शकतो. केवळ वस्तू व जीवाचे रक्षणच महत्त्वाचे नाही, तर इतरांना आपला त्रास होणार नाही, याचीही काळजी घेत आपले आणि इतरांचे रक्षण हे आपले कर्तव्य आहे.




# कमळाबाईचा विपर्यास अन प्रकल्पाची वस्तुस्थिती

उपाध्ये म्हणतात फडणवीसांनी २०१६ साली महाराष्ट्रात इलेक्ट्रिक्स पॉलिसी तयार केली होती. हे लिहितांना उपाध्ये पुन्हा विसरतात की तेव्हा उद्योग खाते हे शिवसेनेकडेच होते आणि सुभाष देसाईंकडे उद्योग मंत्रालयाचा कारभार होता. सुभाष देसाईंनी जो फॉक्सकॉनचा प्रकल्प महाराष्ट्रात येणार नाही असे विधान केले होते तो प्रकल्प विद्यमान सरकारने घालवलेल्या सेमी कंडक्टरचा नसून केवळ आयफोनचा होता त्याचे मूल्य वेदांता - फॉक्सकॉन प्रकल्पापेक्षा कमी होते.

सर्वप्रथम कमळाबाईचे प्रवक्ते उपाध्ये यांना स्मरण करुन देणे गरजेचे आहे की मुंबईत पेंग्विन आणल्यावर गुजरातला आपल्या राज्यात पेंग्विन आणायची उपरती झाली. जी वास्तविकता नाही त्यात रममाण होण्याची कमळाबाईची जुनी सवय आहे. आता कमळाबाईच्या प्रवक्त्यांनी मुळात नसलेले प्रश्न उपस्थित करुन बुध्यांकाचा स्तर किती खालवला आहे याचे लेखी प्रदर्शन केले आहे. खर तर ज्ञान प्रबोधिनी नाव ठेवल्याने ज्ञान असेलच याची शाश्वती नाही, त्यासाठी महाराष्ट्राने उपाधी बहाल केलेल्या प्रबोधनकारांचे विचार स्वीकारावे लागतील. कमळाबाईत गेल्या काही वर्षात जमा झालेल्या असंख्य उपऱ्यांच्या संगतीत उपाध्ये आणि कमळाबाई दोघेही भरकटलेलेच आहेत. याची अनेकदा त्यांनी आपल्या लेखणीतून महाराष्ट्राला जाणीव करुन दिलेली आहे. उपाध्येंनी खोटे बोल पण रेट्न बोलचे कितीही उद्योग केले तरी वेदांता - फॉक्सफॉनचा उद्योग आजच्या घटनाबाह्य आणि नाकर्त्या सरकारच्या केंद्राच्या लांगलुचालनामुळे गेला हे उभ्या महाराष्ट्राला ठाऊक आहे. वस्तुस्थितीला संशयात परिवर्तीत करण्याचा एक केविलवाणा अयशस्वी प्रयत्न उपाध्येंनी करुन बघितला. अगोदर फडणवीसांनी सुध्दा याच विषयी दिशाभूल करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता परंतु ते तोंडघशी पडले. कारण ते रशियात असतांना स्वतः मुख्यमंत्री पंतप्रधानाच्या समवेत याविषयी बोलले आणि त्यांना यापेक्षा मोठा प्रकल्प महाराष्ट्राला देतो सांगून बोळवण केल्याचे प्रकाशित झाले आहे. आजवर कमळाबाईचे शेंडी जानव्याचे हिंदुत्व देशाने बघितले होते. उपाध्येंच्या लिखाणाने लेख सुध्दा शेंडी जानव्याचे लिहिले जाऊ लागले आहेत. इतरांच्या कुंडलीतले राहू केतू शोधण्यापेक्षा देशाला अमंगळ परिस्थितीत लोटणाऱ्या कमळाबाईने आत्मपरीक्षण करणे गरजेचे होते. कमळाबाईची अवस्था इतकी महाराष्ट्रद्रोही आहे की तिला संदर्भ सुध्दा उत्तर भारतातील रुदालीचे द्यावे लागते.

# जीडीपी'चा 'सकल' अर्थ

**सकल देशांतर्गत उत्पादनात भारताने इंग्लंडला मागे टाकले असले, तरी दरडोई उत्पन्न, मानव विकास निर्देशांक आणि सुखाच्या निर्देशांकात आपण इंग्लंडसह अनेक देशांच्या खूप मागे आहोत. बेरोजगारी, विषमता, ही यापुढील काळात देशासमोरची आव्हाने आहेत.**

सकल देशांतर्गत उत्पादनात भारताने इंग्लंडला मागे टाकले असले, तरी दरडोई उत्पन्न, मानव विकास निर्देशांक आणि सुखाच्या निर्देशांकात आपण इंग्लंडसह अनेक देशांच्या खूप मागे आहोत. बेरोजगारी, विषमता, ही यापुढील काळात देशासमोरची आव्हाने आहेत

एखाद्या राष्ट्राची प्रगती होत आहे की नाही हे ठरवण्याचा एक मापदंड म्हणजे जीडीपी. देशांतर्गत होणाऱ्या उत्पादन आणि सेवांची एकूण वार्षिक अंतिम बेरीज म्हणजे जीडीपी देशांची आर्थिक तुलना,श्रीमंती मोजण्यासाठी याचा वापर होतो. प्रत्येक राष्ट्र आपले अर्थ खाते किंवा अन्य अर्थशास्त्र अभ्यास संशोधन संस्थांमार्फत अशी माहिती प्रसिद्ध करते.आंतरराष्ट्रीय नाणेनिधी,जागतिक बँक असे अभ्यास जागतिक स्तरावर प्रसिद्ध करतात. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अभ्यासानुसार भारताचे सकल उत्पादन(२०२१ ची तिमाही) इंग्लंडपेक्षा अधिक झाल्याची ही बातमी ठळकपणे छापली गेली. इंग्लंडचा जीडीपी ८१६ अब्ज




डॉलर तर भारताचा ८५४.७ अब्ज डॉलर, ही गोष्ट नोंद घेण्यासारखी निश्चितच आहे. इंग्लंडचे पाचवे स्थान भारताने पटकावले. एके काळी भारताला गुलाम बनवणाऱ्या देशाहून सकल उत्पादन अधिक झाले याचा भारतीयांना आनंद होणे योग्यच आहे. त्याचबरोबर या आर्थिक नोंदीचा अन्वयार्थही समजून घ्यायला हवा. आपण स्वतंत्र झालो,लोकशाही प्रजासत्ताक झालो,तेव्हा एक गरीब मागासलेला देश अशीच आपली ओळख होती. भारतातील सरासरी आयुष्य फक्त तीस वर्षांचे होते. १९५२पासून आपण पंचवार्षिक योजनांची आखणी करून नियोजनबद्ध विकास हाती घेतला. पुढे आपली ओळख 'विकसनशील देश' अशी झाली. दारिद्र्य निर्मूलन सुरु झाले तशी आपली गणना जागतिक वित्तीय संस्था गरीब मध्यम देशात करु लागल्या.

देशात शेती, औद्योगिक उत्पादन आणि सेवा क्षेत्रही वाढू लागले, शैक्षणिक प्रगती सुरू झाली, अन्न वस्त्र निवारा या मुलभूत गरजांसह शिक्षण,आरोग्य,रस्ते,वीज,बंदरे,रेल्वे ,विमानतळ, उच्चशिक्षण,मोठे सशस्त्र संरक्षक दल,असा विकासक्रम सुरू झाला. लोकसंख्येत दुसऱ्या, तर क्षेत्रफळात सातव्या क्रमांकावरील खंडप्राय देशाची तुलना इंग्लंडसारख्या चिमुकल्या देशाशी करावी लागते, याचा अर्थ समजून घ्यायला हवा. इंग्लंडची लोकसंख्या ६ कोटी ८६लक्ष (आंध्रप्रदेश पेक्षाही कमी)तर भारताची आता जवळपास चीन इतकी म्हणजे १४० कोटी आहे. भारत इंग्लंडपेक्षा क्षेत्रफळाने १३.५पट,तर लोकसंख्येने २०.५पट मोठा. गेल्या पंचवीस वर्षात आपण, दक्षिण कोरिया,ऑस्ट्रेलिया,मेक्सिको,रशिया, ब्राझिल, इटली, फ्रान्स,अशा देशांना मागे टाकत पुढे जात आहोत. आता आपली गणना गरीब मध्यम गटातून मध्यम गटात होणार होतीच. करोनाने सगळे विकासचक्र मंदावले.

## ।। अभंगवाणी ।।



न ये नेत्रां जळ ।
नाहीं अंतरीं कळवळ ॥१॥
तों हे चावटीचे बोल ।
जन रंजवणें फोल ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## देवेंद्र फडणवीस, तुम्ही महाराष्ट्राचे नेते आहात का गुजरातचे ?

# भाजपाचा दावा खोटा !





।मुंबई ।महाईन्यूज।

राज्यात झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीच्या निकालाबाबत भारतीय जनता पक्ष खोटी माहिती देऊन विजयाचा दावा करत आहे तो चुकीचा आहे. काँग्रेस पक्षासह महाविकास आघाडीच्या घटक पक्षांना या निवडणुकीत घवघवीत मिळाले असून काँग्रेस पक्षाला १७५ ग्रामपंचायतींमध्ये घवघवीत विजय मिळाला आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी स्पष्ट केले आहे.

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना पटोले म्हणाले की, ग्रामपंचायत निवडणुक निकालावर भाजपाचा आयटी सेल चुकीची माहिती देत आहे आणि त्यावर भाजपा मोठ्या विजयाचा दावा करत आहे तो धादांत खोटा आहे.

सर्वात जास्त जागा जिंकल्याचा दावा करून भाजपा स्वतःच स्वतःची पाठ थोपटवून घेत आहे. आम्ही सर्व जिल्ह्यातून माहिती घेतली असताना काँग्रेस पक्षाला घवघवित यश मिळालेले स्पष्ट दिसत आहे. काँग्रेस पक्षावर लोकांचा विश्वास आहे तो त्यांनी ग्रामपंचायत निवडणुकीत दाखवून दिला आहे. ग्रामपंचायत निवडणूक ही पक्षाच्या चिन्हावर लढवली जात नाही असेही पटोले म्हणाले.

### नवनियुक्त कार्यकारिणीची बैठक

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसुचित जाती विभागाच्या नवनियुक्त कार्यकारिणीची बैठक एससी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश लिलोठीया यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत ते बोलत होते. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले होते. माजी मंत्री वर्षा गायकवाड, बैठकीला महाराष्ट्र एससी विभागाचे अध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबिरे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव व सहप्रभारी संपतकुमार, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश सरचिटणीस देवानंद पवार यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### देशभर प्रत्येक जिल्ह्यात 'संविधान बचाव रॅली' काढणार

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली कन्याकुमारीपासून भारत जोडो यात्रा सुरु करण्यात आली असून या यात्रेला जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. या यात्रेप्रमाणेच संविधान बचाव रॅली प्रत्येक जिल्ह्यात काढली जाणार आहे, अशी माहिती अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या अनुसुचित जाती विभागाचे अध्यक्ष राजेश लिलोठीया यांनी दिली.

## राज्यातील 175 ग्रामपंचायतीमध्ये काँग्रेसचा विजय : नाना पटोले

### गुजरातच्या विकासाला हातभार लावू नका

वेदांता फॉक्सकॉन प्रकरणी शिंदे-फडणवीस सरकार जनतेची दिशाभूल करत आहे. गुजरात काय पाकिस्तान आहे का? असे म्हणून महाराष्ट्रातून गुजरातमध्ये प्रकल्प गेल्याचे ते समर्थन करताना दिसत आहेत. गुजरातमध्ये गुंतवणूक होत असेल तर त्याला कोणाचाच विरोध नाही पण महाराष्ट्रात होणारा हा प्रकल्प गुजरातच्या घशात घातला आहे.

अशा प्रकारे महाराष्ट्र कमकुवत करून गुजरातच्या विकासाला हातभार लावला जात असेल तर ते आम्ही खपवून घेणार नाही. या प्रकल्पासाठी महाविकास आघाडी सरकारकडून वीजबिल, पाणी, जमीन यासह अनेक बाबतीत सवलतींचे मोठे पॅकेज दिलेले होते. महाराष्ट्र हे गुंतवणुकीसाठी उद्योगांची पहिली पसंदी आहे. महाराष्ट्र २०१४-१९ या काळातही देशात गुंतवणुकीत अग्रेसर होता आणि आजही आहे ही केंद्र सरकारची आकडेवारीच सांगते असेही नाना पटोले यांनी सांगितले.

### संविधान कमजोर करणाऱ्यांच्या विरोधात

डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांनी देशाला दिलेले संविधान भाजपा व आरएसएसला मान्य नाही. संविधान संपुष्टात आणण्याचे प्रयत्न त्यांच्याकडून केले जात आहे. संविधानातील सेक्युलर व सोशलिस्ट शब्द काढण्यासाठी याचिकाही दाखल केलेली आहे.

देशातील मुस्लीम समाजाला मतदानाचा अधिकार काढून घेण्याचाही त्यांचा डाव आहे पण भाजपा व संघ परिवाराचा हा डाव हाणून पाडण्यासाठी काँग्रेसच्या वतीने संविधान रक्षकाची भूमिका घेतली जाणार आहे. संविधान कमजोर करणाऱ्यांच्या विरोधात आम्ही खंबीरपणे उभे राहू असेही लिलोठीया म्हणाले.

---

# नाट्य-चित्रपट क्षेत्राच्या गतवैभवासाठी प्रयत्न करणार !

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही, एका विशेष भेटीत दिलखुलास साधला संवाद

।मुंबई ।महाईन्यूज।

**आपली संस्कृती, कला जोपासलीच पाहिजे. ती आपली जबाबदारी आहे. त्यामुळे मराठी नाट्य, चित्रपट आणि कला क्षेत्राला गतवैभव प्राप्त व्हावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मराठी नाट्य, चित्रपट आणि मालिका क्षेत्रातील मान्यवरांशी मुख्यमंत्र्यांनी "मला तुमचं ऐकायचंय...! आपण एकमेकांबद्दल बोलत असतो. आता एकमेकांशी बोलुया...", असे म्हणत एका विशेष भेटीत दिलखुलास संवाद साधला. यावेळी मराठी नाट्य, चित्रपट आणि मालिका क्षेत्रातील निर्माते, दिग्दर्शक, कलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



गोरेगावच्या दादासाहेब फाळके चित्रनगरीमध्ये चांगले रस्ते, पायाभूत सुविधा, प्रवासी वाहतुक व्यवस्था, सुरक्षा आणि स्वच्छतेची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने पावले उचलण्याचे निर्देश दिल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. चित्रपटांना जीएसटी मधून सूट, ज्येष्ठ कलाकारांसाठी मानधन योजना, त्यांना विनामूल्य वैद्यकीय सुविधा, ज्येष्ठ कलाकार, वादक, तंत्रज्ञ आदींना विमा संरक्षण याबाबत तसेच अनेक धोरणात्मक बाबींविषयी मंत्रालयात बैठक आयोजित करून संबंधित विभागांच्या समन्वयाने चर्चेतून मार्ग काढला जाईल असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी आश्वस्त केले. तसेच चित्रनगरीला भेट देऊन पाहणी करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले."कला क्षेत्राकडे पाहताना आपल्याला कायम त्यामागील झगमगाट दिसतो. मात्र कलाकारांच्या व्यथा त्यांचे प्रश्न समजत नाहीत. ते जाणून घेण्याचा हा प्रयत्न आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघेसाहेब या दोघांनाही कला, संस्कृती आणि मराठी कला क्षेत्राविषयी जिव्हाळा होता. या क्षेत्रातील पडद्यामागील कलावंत, तंत्रज्ञ यांच्याची निगडीत असे अनेक विषय आहेत.

"नाट्यगृहांची परिस्थिती सुधारणे, एकपडदा चित्रपटगृहांच्या समस्या तसेच चित्रपटांसाठी कर सवलत तसेच अन्य मुद्यांवरही विचारविनीमय, चर्चेने उपाययोजना केल्या जातील. संस्कृती, कला जोपासली गेली पाहिजेत. या गोष्टी संवर्धन व्हावे यासाठी प्रयत्न केले जातील. समाजासाठी या गोष्टी महत्वाच्या आहेत. यातूनच उत्तम कलावंत घडतील, ते देश आणि आपल्या राज्याचा नावलौकीक वाढवतील अशी अपेक्षा आहे. त्यामुळे आपल्या नाट्य, चित्रपट सृष्टीला गतवैभव पुन्हा मिळावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील", असेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले. यावेळी निर्मिती, दिग्दर्शन, अभिनय अशा विविध क्षेत्रातील मान्यवर सर्वश्री प्रशांत दामले, अशोक सराफ, सचिन पिळगांवकर, महेश कोठारे, श्रीमती वर्षा उसगांवकर, निर्माता विद्याधर पाठारे, मंगेश कुलकर्णी, पुष्कर श्रोत्री, जितेंद्र जोशी, गायक अवधूत गुप्ते, विजय पाटकर, विजय केंकरे, प्रसाद ओक, चंद्रकांत कुलकर्णी यांनी प्रातिनिधीक स्वरूपात त्या-त्या क्षेत्रातील समस्या, मुद्यांची मांडणी केली.

## देशात चित्ते आल्याने लोकांच्या रोजीरोटीचा प्रश्न सुटणार आहे का?

### अजित पवारांचा केंद्राला सवाल

। मुंबई ।महाईन्यूज।



तुमच्या – माझ्या देशात व महाराष्ट्रात जे महागाईचे, बेरोजगारीचे व कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न आहेत त्यांना व्यवस्थितपणे बाजूला ठेवून तिसरेच प्रश्न पुढे आणले जातात. आता देशात चित्ते आले ठिक आहे. ते वाढवेत, पशुधन वाढवे हेही ठीक आहे. परंतु यातून लोकांच्या रोजीरोटीचा प्रश्न सुटणार आहे का? वेदांताचे काय होणार आहे ते सांगा. तरुणांच्या हाताला नोकरी मिळण्यासाठी अजून किती लाख कोटीची गुंतवणूक येणार हे सांगा असा रोखठोक सवाल राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केंद्रसरकारला केला.

जनता दरबार उपक्रमास उपस्थित राहिल्यानंतर अजित पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी केंद्रसरकार, राज्यसरकारवर हल्लाबोल केलाच शिवाय राजकारणात होणाऱ्या वैयक्तिक टिकेवर नाराजी अजित पवार यांनी व्यक्त केली. वेदांतासारख्या प्रकल्पातून राज्यात गुंतवणूक येत असताना राष्ट्रवादी या चांगल्या कामाला नक्कीच पाठिंबा देईल. मात्र त्यातून पर्यावरणाचा ऱ्हास होता कामा नये असेही अजित पवार यांनी सरकारला ठणकावून सांगितले. वेदांताचा जो फॉक्सकॉन प्रकल्प होता त्याबद्दल चर्चा बरीच झाली.

## शॉर्ट न्यूज »

### भिंत कोसळल्याने चार जणांचा मृत्यू




|नवी दिल्ली|
महाईन्यूज |प्रतिनिधी|

दिल्लीला लागून असलेल्या नोएडामधील सेक्टर-21 येथील जलवायू विहारमध्ये एका सोसायटीची भिंत कोसळून चार जणांचा मृत्यू झाला आहे. तर ढिगाऱ्याखाली अनेक लोक अडकल्याची भीती देखील व्यक्त केली जात आहे. घटनास्थळी मदत आणि बचावकार्य सुरू आहे. भिंतीलगत असलेल्या नाल्याच्या साफसफाईचे काम सुरू होते, त्यात मजूर गुंतले असताना अचानक भिंत कोसळली. अपघातानंतर जेसीबी मशिनने ढिगारा हटवला जात असून अडकलेल्या मजुरांना बाहेर काढले जात आहे. तर, अन्य ९ जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# 'लम्पी' : जयपुरात भाजपाचे आंदोलन!

## "रोगाला राष्ट्रीय आपत्ती घोषित करा", गेहलोत यांची केंद्राकडे मागणी



### लम्पीच्या पार्श्वभूमीवर मुंबईत प्राण्यांचा बाजार, प्रदर्शनावर बंदी

"गायींचा जीव वाचवणे आमची प्राथमिकता आहे. केंद्र सरकारने त्यासाठी लस आणि औषधं पुरवावीत", असे गेहलोत म्हणाले आहेत. लम्पी आजारामुळे जयपुरातील दूध संकलनाला फटका बसला आहे. यामुळे राज्यात उत्पादित मिठाईच्या किमतींमध्ये वाढ झाली आहे. दूध संकलनात १५ ते १८ टक्क्यांनी घट झाली आहे. त्यामुळे वितरणात अडचणी येत असल्याची माहिती 'जयपूर डेअरी फेडरेशन'ने दिली आहे.लम्पी या रोगाचा प्रसार देशातील १३ राज्यांमध्ये झाला आहे. या रोगाचा सर्वाधिक फटका राजस्थानला बसला आहे. लम्पी रोगाचा सामना करण्यासाठी अतिरिक्त मदत आवश्यक असल्याचे अशोक गेहलोत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. या रोगाच्या लशीची निर्मिती झाल्यानंतर राजस्थानला प्राधान्य देण्यात यावे, अशी मागणी गेहलोत यांनी केली आहे.

|नवी दिल्ली |
महाईन्यूज |प्रतिनिधी|

**'लम्पी' आजाराच्या प्रादुर्भावामुळे राजस्थानमध्ये आत्तापर्यंत तब्बल ५७ हजार गायी दगावल्या आहेत, तर ११ लाख गायींना या रोगाची लागण झाली आहे. या विरोधात भाजपाकडून जयपूरमध्ये तीव्र आंदोलन करण्यात आले.**

राज्य विधानभवनावर काढण्यात आलेला मोर्चा पोलिसांनी रोखल्यानंतर आंदोलकांची पोलिसांसोबत शाब्दिक चकमक झाली.

यावेळी आंदोलकांनी बॅरिकेट्स तोडले आणि राजस्थान सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. भाजपाने हा मुद्दा विधानभवनातदेखील उपस्थित केला आहे. या रोगाकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी एका भाजपा आमदाराने विधानभवन परिसरात गायीला आणत रोगाची भीषणता लक्षात आणुन दिली. दरम्यान, या रोगाला केंद्र सरकारने राष्ट्रीय आपत्ती घोषित करावी, अशी मागणी राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी केली आहे.

# चंदीगड विद्यापीठ परिसरात विद्यार्थ्यांचे धरणा आंदोलन !

## तिघांना अटक, SIT चौकशीचे आदेश

|नवी दिल्ली |
महाईन्यूज |वृत्तसंस्था |

चंदीगड येथील एका खासगी विद्यापीठातील 'लीक व्हिडिओ' प्रकरणी विद्यापीठातील एका विद्यार्थिनीसह तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सनी मेहता आणि रंजक वर्मा असे अटक करण्यात आलेल्या दोन आरोपींची नावे आहेत. या दोघांवर एका विद्यार्थीनीला तिच्या मैत्रिणींचे आपत्तीजनक व्हिडीओ बनवण्यासाठी ब्लॅकमेल केल्याचा आरोप आहे. दरम्यान, हा व्हिडीओ व्हायरल होताच विद्यार्थ्यांनी शनिवारी रात्री विद्यापीठ परिसरात धरणा आंदोलन सुरू केले होते. जवळपास ६० विद्यार्थीनींचा आपत्तीजनक व्हिडीओ व्हायरल झाला असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला होता. तर विद्यापीठ प्रशासनाने जारी केलेल्या निवेदनात एकच व्हिडीओ व्हायरल झाल्याचे म्हटले होते. तसेच एका विद्यार्थिनीनेच हे व्हिडीओ बनवत आपल्या हिमाचलमधील मित्राला पाठवले असल्याचेही या निवेदनात म्हटले होते. विद्यापीठ परिसरात कोणत्याही विद्यार्थीनीने आत्महत्या केली नसून ही केवळ अफवा आहे. या पार्श्वभूमीवर येत्या २४ सप्टेंबरपर्यंत विद्यापीठात कोणताही वर्ग भरणार नसल्याचे विद्यापीठ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांनी भादंविच्या कलम ३५४-क आणि आयटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.



### आरोपींना पोलीस कोठडी

पोलिसांनी या प्रकरणातील सर्व आरोपींचे मोबाईल जप्त केले असून ते फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. तसेच पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी याप्रकरणी एसआयटी चौकशीचे आदेश दिले आहेत. दरम्यान, पोलिसांनी सर्व आरोपींना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याचे अनावरण करतील.

## गुजरातमध्ये काँग्रेस सरकार आले तर, मोफत वीज आणि कर्जमाफी देण्याचे राहुल गांधींचे आश्वासन

|नवी दिल्ली
|महाईन्यूज |वृत्तसंस्था |



गुजरातमध्ये या वर्षअखेरीस विधानसभा निवडणुका होणे अपेक्षित आहे (. आम आदमी(aap) पक्षापासून ते भाजपपर्यंत(bjp) सर्वच पक्ष आपापल्या परीने निवडणुकांची जोरदार तयारी करण्यात व्यस्त आहेत. भारत जोडो यात्रेवर असलेले काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी एक मोठी घोषणा केली आहे. ही घोषणा करत असताना राहुल गांधी म्हणाले की, गुजरातमध्ये जुनी पेन्शन व्यवस्था पुन्हा सुरू केली जाईल. तयच संदर्भात मंगळवारी एका ट्विटमध्ये राहुल गांधी यांनी पेन्शन व्यवस्थेचा विषय काढत भाजपवर निशाणा साधला. राहुल गांधी यांनी ट्विट करून म्हटले की, 'भाजपने जुनी पेन्शन येजना रद्द केली आणि वृद्धांना स्वावलंबी बनवले. जुनी पेन्शन हा सरकारी कर्मचाऱ्यांचा हक्क आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी पुढे म्हणाले की, राजस्थान आणि छत्तीसगडप्रमाणे गुजरातमध्ये काँग्रेसचे सरकार आल्यास जुनी पेन्शन व्यवस्था पुन्हा सुरू केली जाईल. असं आश्वासन राहुल गांधी यांनी दिले. यात महत्वाची बाब अशी आहे की, हजारो सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी जुनी पेन्शन प्रणाली पूर्ववत सुरू करण्यात यावी नुकतेच आंदोलन केले होते. जुनी पेन्शन योजना पुन्हा सुरू करण्याची मागणी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी केली आहे .500 रुपयांना सिलिंडर आणि मोफत वीज जाहीर याआधीही राहुल गांधी यांनी गुजरात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घोषणा केल्या होत्या. राज्यात काँग्रेसची सत्ता आल्यास शेतकऱ्यांचे ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज माफ केले जाईल असे राहुल गांधी म्हणाले होते. यासोबतच 500 रुपयांना एलपीजी सिलिंडर, शेतकऱ्यांना मोफत वीज आणि सर्वसामान्य ग्राहकांना 300 युनिटपर्यंत मोफत वीज देण्याचे आश्वासन राहुल गांधींनी जनतेला दिले होते.

# ‘नेबर्स’ चित्रपट 23 सप्टेंबर पासून संपूर्ण महाराष्ट्रात होणार प्रदर्शित

‘कल्पना रोलिंग पिक्चर्स प्रौडक्शन’ निर्मित आणि ‘मिठुवाला प्रौडक्शन्स’ यांचे सादरीकरण असलेल्या ‘नेबर्स’ हा चित्रपट 23 सप्टेंबर पासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होत आहे. निर्माते हितेश पटेल आणि दिग्दर्शक विनय श्रीरंग घोलप यांच्या या चित्रपटात एक रहस्यमय प्रेम कथा चित्रित करण्यात आली आहे.




विज्ञान-तंत्रज्ञानाची कल्पनारम्य कथा असलेल्या या चित्रपटात चेतन चिटणीस, कृतिका गायकवाड, सिद्धार्थ बोडके, प्रसाद जवादे, शैलेश दातार, नेहा बाम , अदिती येवले आदी कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत. हा चित्रपट येत्या 23 सप्टेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होत आहे.

दिग्दर्शक विनय घोलप यांचीच पटकथा असलेल्या या चित्रपटाचे संवाद हृषीकेश कोळी आणि विनय घोलप यांनी लिहिले आहेत तर छायालेखनाची महत्वाची जबाबदारी कॅमेरामन आशुतोष आपटे यांनी सांभाळली आहे. गीतकार मंगेश कांगणे यांच्या गीतांना संगीतकार निषाद यांनी स्वरसाज चढविला आहे तसेच पार्श्वसंगीतही त्यांनीच दिले आहे. श्री गुरु पाटील आणि महेश किल्लेकर यांनी संकलन केले असून चित्रपटाची तांत्रिक बाजू विशाल तळकर (व्हीएफएक्स), भूषण दळवी (डीआय), आणि दिनेश उचिल व शंतनू अकेरकर (ध्वनी-रेखन), अनुप देव आदी तंत्रज्ञांनी सांभाळली आहे. चित्रपटाचे कार्यकारी निर्माते राहुल भोसले असून कला दिग्दर्शन संजीव राणे यांनी केले आहे. शीतल पावसकर यांनी वेशभूषेची जबाबदारी सांभाळली आहे.

# डॉक्टर जी’मध्ये आयुष्मान खुराना आणि रकुल प्रीत सिंह झळकणार एकत्र

बॉलिवूड चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाची छाप उमटवणारा अभिनेता आयुष्मान खुरानाने मागील काही वर्षांपासून एकानंतर एक जबरदस्त चित्रपटांमध्ये काम करत आपली ओळख निर्माण केली आहे. अशातच आयुष्मान खुरानाने त्याच्या ‘डॉक्टर जी’ आगामी चित्रपटाची घोषणा केली आहे. या चित्रपटामध्ये आयुष्मान खुरानासोबत अभिनेत्री रकुल प्रीत सिंह आणि शेफाली शाह सुद्धा मुख्य भूमिकेत दिसणार आहे. नुकत्याच काही वेळापूर्वी आयुष्मानने ‘डॉक्टर जी’ची घोषणा केली आहे. पोस्ट शेअर करत आयुष्मानने लिहिलंय की,“माझं आयुष्य गुगलीने भरलेलं आहे. ऑर्थोपेडिक्सवर तयार झाला डॉक्टर जी, आपल्या अपॉइंटमेंट्साठी तयार राहा. ‘डॉक्टर जी’ 14 ऑक्टोबर 2022 रोजी चित्रपटगृहात होणार प्रदर्शित” दरम्यान, या चित्रपटामध्ये आयुष्मानने एका इनेकोलोगिस्टची भूमिका साकारलेली आहे. तसेच रकुल प्रीत सिंह चित्रपटात डॉ फातिमा सिद्दीकी आणि शेफाली शाह डॉ.नंदिनी श्रीवास्तव आणि शीबा चड्डा आयुष्मान खुरानाच्या आईची भूमिका साकारणार आहे.




हा चित्रपट पुढच्या महिन्यातील 14 तारखेला प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या पहिल्या लूकने प्रेक्षक चित्रपट पाहण्यासाठी खूप उत्सुक झाले आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन अनुभूति कश्यपने केलं आहे. ‘डॉक्टर जी’मध्ये आयुष्मान एका मेडिकल विद्यार्थ्याच्या भूमिकेत असणार आहे.



# जगात सर्व काही ठिक नाही...” भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रियांका चोप्राने मांडले मत

बॉलिवूडसह हॉलिवूड गाजवणारी अभिनेत्री म्हणून प्रियांका चोप्राला ओळखले जाते. ती नेहमी सामाजिक स्तरांवरील विविध विषयांबद्दल भाष्य करत असते. काही दिवसांपूर्वी प्रियांकाने संयुक्त राष्ट्र महासभेला संबोधित केले. यावेळी तिने तिच्या भाषणादरम्यान जगभरात सुरु असलेल्या विविध विषयांबद्दल भाष्य केले. याचे काही फोटो आणि व्हिडीओही प्रियांकाने शेअर केले आहेत. ‘हल्ली जगात सर्व काही ठिक चालेलं नाही’, असे प्रियांका चोप्राने म्हटले. यामुळे सध्या ती चांगलीच चर्चेत आली आहे.

प्रियांका चोप्राने न्यूयॉर्कमधील संयुक्त राष्ट्र महासभेतील काही फोटो शेअर केले आहेत. यात तिने UNGA मधील शाश्वत विकास उद्दिष्टे (SDG) क्षणाचे अनेक व्हिडिओ आणि फोटो शेअर केले आहेत. यातील एका फोटोत प्रियांकाने वेनेसा नकातेसोबत पोज दिली. तर इतर फोटोत तिच्यासोबत मलाला युसुफ, अमांडा गोरमन, सोमाया फारुकी आणि ज्युडिथ हिल यांच्यासोबत पोज देताना दिसत आहे. सध्या तिच्या भाषणाचा एक व्हिडीओ व्हायरल होताना दिसत आहे. यात ती म्हणाली, “आज आपण सर्वजण एका अशा महत्त्वपूर्ण टप्प्यावर भेटलो आहोत. या ठिकाणी जागतिक एकता ही नेहमीपेक्षा अधिक महत्त्वाची आहे. सध्या जग हे हवामानातील बदल आणि कोव्हिड १९ या साथीच्या रोगाचा सामना करत आहे. आधीच जगभरात संघर्ष, क्रोध, गरिबी, उपासमार आणि असमानता यासारख्या चिंता सतावत आहेत. त्यामुळेच जगात सर्व काही ठीक नाही. पण ही संकटे अचानक आलेली नाहीत. याबद्दल योग्य योजना आखून त्या सोडवता येतील. ती योजना युनायटेड नेशन्स सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स यांच्याकडे आहे.” “मी भारतात लहानाची मोठी झाली आहे. भारतात जगातील इतर अनेक भागांप्रमाणेच अनेक मुलींना शिक्षणाचा हक्क मिळवणे हे आव्हान वाटते. एकीकडे मुलांना शिकायचे असते कारण त्यांच्या ती प्रबळ इच्छा असते.

# चाहत खन्ना – उर्फी जावेदमधला वाद मिटेना

गेले काही दिवस अभिनेत्री उर्फी जावेद आणि अभिनेत्री चाहत खन्ना यांच्यातील वाद म्हणजे चर्चेचा विषय बनला आहे. या दोघीजणी गेल्या काही दिवसांपासून एकमेकांवर स्पष्ट शब्दात टीका करताना दिसत आहेत. इतकेच नव्हे तर त्यांनी सभ्यतेची पातळी ओलांडली आहे. या दोघींमधील वाद संपण्याचं नाव घेत नाहीये. सुकेश चंद्रशेखर प्रकरणात अभिनेत्री जॅकलीन, नोरा फतेहीनंतर आता अभिनेत्री चाहत खन्नाचे नाव समोर आले आहे. त्यावरुन उर्फीने तिला टोलाही लगावला. या दोन्ही जणींमधील ही भांडणं आता सोशल मीडियावर नेटकऱ्यांसाठी मनोरंजनाचा विषय झाली आहे. काही दिवसांपूर्वी चाहतने उर्फीला म्हटलं होतं की, ती आई, पत्नी आणि काकू होण्याच्या पात्रतेची नाही. त्यावरुन उर्फी संतापलेली दिसून येत आहे. त्यांनी या दोन्ही अभिनेत्रींच्या भांडणावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या आहेत.

चाहतनं तिच्या इंस्टा स्टोरीवरुन एक भलीमोठी पोस्ट शेअर केली आहे. त्यामध्ये तिनं लिहिलं आहे की, “केवळ ऐकीव माहितीवर विश्वास ठेवून आपलं मत मांडणाऱ्या व्यक्तींना दुसऱ्यांना मुर्ख बनवायला आवडते. अशावेळी त्यांच्याशी वाद घालण्यात काहीच अर्थ नसतो. आपण आपलं काम करावं. त्या व्यक्तीला जर अक्कल असती तर तिने काहीतरी काम केलं असतं. शॉर्ट कपडे परिधान करुन लोकांकडून स्वतःचं हसं करुन घेतलं नसतं.”



## शॉर्ट न्यूज »

### प्रज्ञानंदची दमदार कामगिरी



न्यूयॉर्क । महाईन्यूज

भारताचा युवा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने नामांकित खेळाडूंचा सहभाग असलेल्या ज्युलियस बेअर जनरेशन चषक ऑनलाईन बुद्धिबळ स्पर्धेची दमदार सुरुवात केली. त्याने सुरुवातीचे सलग तीन सामने जिंकले, पण चौथ्या सामन्यात त्याला अमेरिकेच्या १५ वर्षीय ख्रिस्तोफर योकडून पराभव पत्करावा लागला. १७ वर्षीय प्रज्ञानंदने पहिल्या तीन फेऱ्यांमध्ये अनुक्रमे वॅसिल इव्हान्चुक, यान क्रिस्टोफ-डुडा आणि बोरिस गेलफंड या अनुभवी खेळाडूंवर मात केली. त्यामुळे आठ दिवस चालणाऱ्या या स्पर्धेच्या पहिल्या दिवसअखेर प्रज्ञानंद गुणतालिकेत अन्य तीन खेळाडूंसह दुसऱ्या स्थानावर होता. जगज्जेत्या मॅग्नस कार्लसनने तीन सामने जिंकत आणि एक लढत बरोबरीत सोडवत गुणतालिकेत अग्रस्थान मिळवले. मॅग्नसने भारताच्या अर्जुन एरिगेसीवरही मात केली. मात्र, अर्जुनने पहिल्या फेरीतील पराभवानंतर दमदार पुनरागमन करताना सलग तीन लढती जिंकल्या.

# ऑस्ट्रेलियाच खरे विश्वविजेते!

## 208 धावांचा डोंगर उभा करूनही भारतीय संघाचा चार गडी राखून पराभव

।होव्ह । महाईन्यूज ।

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन सामन्यांच्या टी२० मालिकेतील पहिला सामना आज मोहालीत खेळला गेला. यामध्ये ऑस्ट्रेलियाचा कर्णधार ॲरॉन फिंचने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजीची संधी मिळालेल्या भारतीय संघाने खराब सुरुवातीनंतरही जबरदस्त फलंदाजी करत २०८ धावा धावफलकावर लावल्या.



या धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाच्या मॅथ्यू वेड आणि टिम डेव्हिड या दोघांच्या झुंजार खेळीने अखेरपर्यंत हार न मानता चार गड्यांनी विजय संपादन केला. कॅमेरून ग्रीन याने ३० चेंडूत ६१ धावांची खेळी केली त्याला सामनावीराच्या किताबाने गौरविण्यात आले. उमेश यादवने १२व्या षटकात दोन गडी बाद करत सामना फिरवला. अक्षर पटेलने उपयुक्त गोलंदाजी करून भारताला विजयी मार्गावर ठेवले होते, परंतु हर्षल पटेलने टाकलेल्या १७व्या षटकात ऑसींनी पुन्हा सामना फिरवला. हार्दिक पांड्या, लोकेश राहुल व सूर्यकुमार यादव यांच्या मेहनतीवर गोलंदाजांनी पाणी फिरवले. सोडलेले दोन झेलही महागात पडले. भारतीय गोलंदाजांना २०८ धावांचा बचाव करता आला नाही आणि ऑस्ट्रेलियाने विजय मिळवून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली.

कॅमेरून ग्रीन आणि स्टीव्हन स्मिथ यांची चांगलीच भागीदारी रंगली. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी अर्धशतकी भागीदारी रचली. ग्रीनने यावेळी आपले धडाकेबाज अर्धशतकही साकारले. या दोघांनाही यावेळी भारतीय खेळाडूंनी झेल सोडत जीवदान दिले.

# सनिल, दियाच्या कामगिरीकडे लक्ष!

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील टेबल टेनिसचे सामने आजपासून

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील टेबल टेनिसच्या सामन्यांना मंगळवारपासून सुरुवात होणार असून, महाराष्ट्राच्या आशा सनिल शेट्टी आणि दिया चितळे यांच्यावर अवलंबून आहेत.

गुजरात येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेला २९ सप्टेंबरपासून प्रारंभ होणार आहे. मात्र, ३० सप्टेंबरपासून जागतिक अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा रंगणार आहेत. त्यामुळे राष्ट्रीय स्पर्धेत सर्वोत्तम खेळाडूंना खेळता यावे यासाठी यातील टेबल टेनिसच्या स्पर्धा लवकर खेळवण्यात येत आहेत. राष्ट्रीय स्पर्धेतील टेबल टेनिसमध्ये शरथ कमाल, जी. साथियन आणि मनिका बात्रा यांसारखे भारताचे प्रमुख खेळाडू सहभाग नोंदवतील.

महाराष्ट्राच्या पुरुष संघात सनिलसह दिपीत पाटील, सिद्धेश पांडे, रवींद्र कोटियन, रिगन अल्बुकर्क, तर महिला संघात दियासह रिथ रिश्या, स्वस्तिका घोष, श्रुती अमृते आणि अनन्या बसाक यांचा समावेश आहे.



महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही